# निवासी डॉक्टरांचा संप सुरुच

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी)- स्टायपेंड वेळेवर मिळावा, स्टायपेंडमध्ये वाढ करावी, अकोला, आंबेजोगाई, लातूर, नागपूर या सरकारी मेडिकल कॉलेजेसमध्ये अनेकदा स्टायपेंड वेळेवर मिळत नाही, अशा विविध मागण्यांकडे राज्य सरकार व मुंबई पालिकेचे लक्ष वेधण्यासाठी निवासी डॉक्टरांनी संपाचे हत्यार उपसले. दरम्यान, सायन, नायर, केईएम व जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी आझाद मैदानात आंदोलन करुन मागण्यांकडे लक्ष वेधले. मागण्या मान्य होईपर्यंत आता माघार नाही, अशी भूमिका निवासी डॉक्टरांनी घेतली असून संप सुरुच राहणार असल्याचे मध्यवर्ती मार्ड संघटनेच्या अध्यक्षा डॉ. कल्याणी डोंगरे यांनी सांगितले.

राज्यातील निवासी डॉक्टरांच्या संघटनेकडून बुधवारी सकाळपासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. केंद्राकडून लागू करण्यात येणारे नॅशनल मेडिकल कमिशन विधेयक आणि वाढीव विद्यावेतनाच्या मुद्द्यावर हा संप पुकारला आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत संप मागे घेण्यात येणार नसून एकही निवासी डॉक्टर कामावर रुजू होणार नसल्याचे डोंगरे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, निवासी डॉक्टरांच्या संपाचा गुरुवारी रुग्ण सेवेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. केंद्रीय मार्ड अध्यक्ष डॉ. कल्याणी डोंगरे म्हणाल्या, स्टायपेंड वाढीसह अनेक मागण्या आम्ही सरकारकडे केल्या. मात्र आम्हाला फक्त आश्वासनं मिळतात. एप्रिल, २०१९ मध्ये आम्हाला स्टायपेंड वाढवण्याचं आश्वासन दिलं होतं, मात्र ते अद्याप पूर्ण झालं नाही. स्टायपेंड वेळेवरही मिळत नाही. याशिवाय एनएमसी विधेयकातील तरतुदींमध्ये दुरुस्ती झाली पाहिजे.टीबी झालेल्या डॉक्टरांना आजारपणाची आणि गर्भवती महिला डॉक्टरांना प्रसूतीची भरपगारी रजा मिळावी, तसा नियम असायला हवा. तसेच पोस्ट ग्रॅज्युएशनच्या जवळपास ५० टक्के विद्यार्थ्यांना मान्यता नाही. फक्त २,२७८ डॉक्टरांना मान्यता आहे, प्रत्येकाला मान्यता मिळायला हवी ही आमची मागणी आहे. अशा विविध मागण्यांसाठी पुणे, कोल्हापूर वगळता राज्यात इतर सर्वत्र निवासी डॉक्टरांचा संप सुरू आहे. राज्यातील १६ वैद्यकीय रुग्णालयातील ४,०६० निवासी डॉक्टर या संपात सहभागी झाले आहेत. संपात मुंबईतील दोन हजारांपेक्षा जास्त डॉक्टरांचा समावेश आहे. आमच्या संपाचा रुग्णसेवेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेतल्याचे त्या म्हणाल्या.

## हायकोर्टात याचिका, सुनावणी शुक्रवारी

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी) - राज्यातील निवासी डॉक्टरांच्या संघटनेने विद्यावेतनाची प्रलंबित मागणी, टीबी झालेल्या डॉक्टरांना रजा, महिला डॉक्टरांना प्रसूती रजा अशा विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी पुकारलेल्या संपाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते अफक मांडवीया यांच्यावतीने ॲड. दत्ता माने यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी दि. ९ ऑगस्टला होण्याची शक्यता आहे.

निवासी डॉक्टरांनी पुकारलेला हा संप बेकायदा आहे. उच्च न्यायालयाने या पूर्वी दिलेल्या आदेशात संप करण्यास येणार नाही स्पष्ट केले आहे. तसेच निवासी डॉक्टरांच्या संघटनेने यापुढे संप केला जाणार नाही अशी लेखी हमी दिलेली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार या डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींची समितीही डॉक्टरांच्या प्रश्नासाठी स्थापन करण्यात आलेली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही डॉक्टरांनी संप पुकारल्याने न्यायालयाचा अवमान प्रकरणी त्याच्या विरोधात अवमान कारवाई करण्यात यावी अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

# बेस्टला ११३६.३१ कोटींचा निधी

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी)- कर्जाच्या ओझ्याखाली दबून डबघाईला आलेल्या बेस्टला कर्जातून मुक्त करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून ११३६.३१ कोटीची बिनव्याजी मदत देण्यात येणार आहे. यासंदर्भातील प्रस्तावाला स्थायी समितीने एकमताने मंजुरी दिली. त्यामुळे बेस्टला कर्जातून मुक्त होण्यास हातभार लागणार आहे.

कर्जाचा बोजा आणि दररोज होणाऱ्या तोट्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या बेस्ट'ला पालिकेने महिनाभरापूर्वीच ६०० कोटींची आर्थिक मदत केली आहे. मात्र ही मदत तुटपूंजी ठरत असल्याने कर्जाचा भार कमी होण्यासही हातभार लागत नाही नव्हता. सध्या बेस्टवर सुमारे अडीच हजार कोटी रूपयांचे कर्ज असून त्यावरील हप्ता व व्याजापोटी दर महिन्याला २०० कोटी बेस्टला द्यावे लागते. त्यामुळे हा कर्जाचा भार कमी करण्यासाठी पालिकेने पुन्हा १२०० कोटी रूपये देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. यामुळे एकूण १८०० कोटी रूपये बेस्टला दिले पालिकेकडून मदत दिली जाणार आहे. बिनव्याजी १२०० कोटी रुपये देण्यासाठीच्या प्रस्तावाला बुधवारी स्थायी समितीने मंजुरी दिली. या रकमेमुळे बेस्टवरील कर्ज व त्यावरील व्याजाची रक्कम कमी होवून बेस्ट कर्जाच्या खाईतून बाहेर येण्यास मदत होणार आहे.

**सुमारे दोन हजार कोटींचे कर्ज**

बेस्ट'वर सध्या सुमारे दोन हजार कोटींचे कर्ज आहे. या कर्जाचे दरमहा सुमारे २०० कोटींचे व्याज विविध बँकांना द्यावे लागते. त्यामुळे पालिकेने किमान सोळाशे कोटींची आर्थिक मदत करावी अशा मागणीचे पत्र स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी आयुक्तांना दिले होते. बेस्ट'ला आर्थिक मदत करण्याच्या शिवसेनेच्या मागणीला सर्वपक्षीयांनी पाठिंबा दिला होता. त्यानुसार आता कर्जमुक्तीसाठी बाराशे कोटींची मदत मिळाली आहे.

# ऑनलाइन मंडप परवानग्यांबाबतचा घोळ मिटला

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी)- गणेशोत्सव मंडळांना पालिकेकडून मिळणाऱ्या ऑनलाइन परवानग्यांमध्ये पासवर्ड'चा निर्माण झालेला घोळ दूर झाला आहे. मुंबईभरातील सुमारे ११ हजार मंडळांपैकी आतापर्यंत दीड हजार मंडळांनी पालिकेकडे अर्ज केले होते. त्यापैकी १०० मंडळांना परवानग्या देण्यात आल्या आहेत.

मुंबईतील सार्वजनिक मंडळांना पालिकेकडून ऑनलाइन परवानगी दिली जाते. त्यानुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना १९ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहेत. यामध्ये मंडळांना आपापल्या विभाग कार्यालयात मंडप परवानगीसाठी अर्ज करता येत आहे. अर्ज केल्यानंतर संबंधित विभाग कार्यालयाकडून पो-लीस, ट्रॅफिक विभागाकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर मंडळांना परवानग्या दिले जात आहे. मात्र गेले काही दिवस पालिकेकडून पोलीस, ट्रॅफिक आणि फायर विभागाला परवानग्यांबाबत पासवर्ड' देण्यात तांत्रिक अडचणी आल्याने परवानग्यांची प्रक्रिया रखडली होती. दरम्यान, आता ही अडचण दूर झाल्याने मंडळांना परवानग्या देण्यात कोणतीही अडचण नसल्याची माहिती उपायुक्त नरेंद्र बर्डे यांनी दिली.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारण्यासाठी ऑनलाईन परवानगी दिली जाते. त्यामुळे मंडळांना रांगा लावण्यात जाणारा वेळ वाचतो आहे. मात्र गेल्यावर्षी ऑनलाईन अर्ज करताना अनेक मंडळांना अडचणी आल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे ऑनलाईनसह ऑफलाईनही परवानग्या देण्यात यावी, अशी मागणी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष नरेश दहिबावकर यांनी प्रशासनाकडे केली असल्याचे त्यांनी सांगितले.

# वांद्रे येथील एमटीएनएल आगप्रकरणी गुन्हा दाखल

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी) - वांद्रे येथील एमटीएलएल आगप्रकरणी अखेर वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या आगप्रकरणी एमटीएनएलच्या दोन अधिकाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यात एस. पंडितराव आणि आर. बी यादव यांचा समावेश आहे.

गेल्या महिन्यांत वांद्रे येथील एमटीएनएलच्या इमारतीला भीषण आग लागली होती. या आगीत सुमारे ८० हून अधिक लोक अडकले होते, मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच प्रसंगावधान दाखवून अडकलेल्या सर्वांची सुखरुप सुटका केली होती. काही वेळाने ही आग नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले होते. याप्रकरणी काही जणांची जबानी नोंदविण्यात आली होती. तपासात गेल्या वर्षीही या इमारतीमध्ये आग लागली होती. त्यावेळी इमारतीमधील फायर फायटिंग यंत्रणा चालू नव्हती. या घटनेनंतर त्यात काही सुधारणा झाली नव्हती. वेळीच फायर फायटिंग यंत्रणा बसविली असती तर ही दुर्घटना घडली नसती. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात हलगर्जीपणा झाल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षी लागलेल्या आगीनंतर अग्निशमन दलाने एमटीएलएल प्रशासनाला तशी नोटीस बजाविली होती, मात्र त्या नोटीसकडेच पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते. त्यामुळे सोमवारी याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध हलगर्जीपणाचा गुन्हा नोंदविला आहे. या गुन्ह्यांचा तपास सुरु असून दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

RACHANA SANSAD's ACADEMY OF ARCHITECTURE
Additional Counseling Round for FIRST YEAR B.ARCH. Course (UN-AIDED)

As per the directives given by Admission Regulating Authority, M.S.for an Additional Counseling Round for all the candidates (Open / Reserved / Male / Female) as per Maharashtra State General Merit list after the end of CAP ROUND-III for the Vacant Seats for First Year B.Arch. Degree Course in Architecture (Un-Aided) for the session 2019-20 will be conducted at Academy of Architecture on 10 th August 2019 at 10.00am sharp (Reporting Time).

Venue: Academy of Architecture, 278, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai- 400025. Phone : 022-24301024 / 24310807
Director, Academy of Architecture (Un-Aided)

NIIF IFL INFRASTRUCTURE FINANCING
NIIF Infrastructure Finance Limited
("Formerly IDFC Infrastructure Finance Limited")
Registered Office: North Wing, 3rd Floor, UTI Tower, GN Block, Bandra Kurla Complex, Mumbai 400 051, Maharashtra.
CIN No: U67190MH2014PLC253944 Website: www.niifl.in Tel. No: +91 22 68591300.

PUBLIC NOTICE

It is hereby informed that the name of **IDFC Infrastructure Finance Limited** (originally incorporated as IDFC Infra Debt Fund Limited on March 7, 2014) under the Companies Act, 2013 is **changed to "NIIF Infrastructure Finance Limited"** with effect from July 11, 2019.

It is further informed that **the registered office of the Company has been shifted** from C-32, G- Block, Naman Chambers, Bandra Kurla Complex, Bandra East, Mumbai 400051, Maharashtra **to North Wing, 3rd Floor, UTI Tower, GN Block, Bandra Kurla Complex, Mumbai 400 051, Maharashtra** with effect from July 16, 2019.

All stakeholders are requested to take note of the above information.

Place: Mumbai
Date: August 07, 2019
Sd/-
For NIIF Infrastructure Finance Limited

मध्य रेल्वे
वातानुकूलित चारचाकी वाहन भाडेतत्वावर घेणे

भारताच्या राष्ट्रपतींच्याकरिता आणि वतीने आर्थिक सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी (बांधकाम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, 6 वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, 400001 खालील कार्यासाठी प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून खुली ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. **कार्याचे नाव:** आर्थिक सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी (बांधकाम) यांच्या सरकारी कामांसाठी एक वातानुकूलित इंडिगो/एस्टीम/फोर्ड आयकॉन/ ISZ1800MPFI./मारुती SX4 (व्हीएक्सआय) सारखे चारचाकी वाहन चोवीस महिन्यांकरिता भाडेतत्वावर घेणे. **अंदाजित किंमत:** ₹ 8,77,420/-; **बयाणा राशी:** ₹ 17,600/-; **कार्यकाल:** 24 महिने; **निविदा दस्तऐवजांची किंमत:** ₹ 2,000/-; **निविदा दस्तऐवजांची उपलब्धता:** वरील कार्यासाठी निविदा दस्तऐवज www.ireps.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध होतील. **निविदा दस्तऐवज सादर करण्याचा आणि उघडण्याचा दिनांक:** पूर्णतः भरलेल्या ई-निविदा वर उल्लेखित संकेतस्थळावर 22.08.2019 रोजी 16:00 वाजेपर्यंत इलेक्ट्रॉनिक रूपात भरल्या जाव्यात. निविदाकारांसाठी महत्वपूर्ण **सूचना: अ)** संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो कि त्यांचे निविदा अर्ज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात भरण्याआधी नियम आणि अटी, पात्रता मानदंड, बयाणा राशी, आणि निविदा दस्तऐवज यांची किंमत जमा करण्याचे माध्यम याबाबत निविदा दस्तऐवजांच्या तपशिलाचा संदर्भ घ्यावा. **ब)** मध्य रेल्वेने नुकतीच ई-निविदा प्रणाली सुरु केली आहे. सर्व इच्छुक निविदाकारांना सर्वप्रथम आयआरपीएसच्या www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. **OPEN TENDER NOTICE No: HVFAC2019-20REV dated 31-07-2019.**
485
आरपीएफ हेल्पलाईन 182

भारतीय खाद्य निगम
FOOD CORPORATION OF INDIA

निविदा सूचना

**निविदा क्र.जन./32(6)/आरओ/एचके/झेरॉक्स मशीन/2019** भारतीय खाद्य निगम यांच्यासाठी आणि त्यांच्या वतीने महाव्यवस्थापक (महा.), क्षेत्रीय कार्यालय, मुंबई, एफसीआय बिल्डिंग, 5 वा आणि 6 वा मजला, राजेन्द्र नगर, दत्तपाडा रोड, बोरिवली (पूर्व), मुंबई 400066 हे दोन वर्ष मुदती करीता (परस्पर संमतीने आणखी तीन महिने मुदतवाढ क्षम) क्षेत्रीय कार्यालय (महा) येथे दोन खाजगी झेरॉक्स मशीन भाड्याने घेण्यासाठी दुहेरी बोली पद्धतीने ई-निविदा मागवीत आहेत. ऑनलाइन बोल्या सादर करण्याची शेवटची तारीख आहे **दि.29/08/2019 दुपारी 2.30 वाजेपर्यंत** बोल्या **30/08/2019 रोजी दुपारी 3 वाजता** उघडण्यात येतील. अन्य सर्व तपशीलांसाठी कृपया **www.fci.nic.in** आणि **http://eprocure.gov.in** येथे भेट द्या-कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व ई-निविदा नाकारण्याचा अथवा स्वीकारण्याचा अधिकार महाव्यवस्थाक (महा.) हयांच्याकडे राखून ठेवण्यात आला आहे. अन्या सर्व अटी आणि शर्ती, इ-निविदा प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे असतील.

नोंद.

1. बोलीपूर्व सभा **दि.19/08/2019 रोजी दुपारी 3 वाजता,** 6 वा मजला, एफसीआय, रीजनल ऑफिस, बोरिवली, मुंबई येथे घेण्यात येईल.
2. कोणतेही शुद्धिपत्र केवळ उपरोल्लेखित वेबसाइटवर प्रसिद्ध केले जाईल.

# तुंगारेश्वर अभयारण्याची सीमा ४० दिवसात निश्चित करणार

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी) - वसईतील तुंगारेश्वर अभयारण्य संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर या अभयारण्याच्या सीमा निश्चित करण्यास अपयशी ठरलेल्या केंद्र तसेच राज्य सरकारला फटकारल्यानंतर प्रशासन ताळ्यावर आले. ४० दिवसात ही परिसीमा ठरवून त्याबाबत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती राज्य सरकारने आज मुंबई उच्च न्यायालयात दिली.

वसईतील तुंगारेश्वर अभयारण्य शासनाने संवेदनशील (इको सेन्सेटीव्ह) झोन म्हणून निश्चित केला असून या अभयारण्याची परिसीमा ठरविण्यासंदर्भात डिसेंबर २०१६ साली अधिसूचना काढण्यात आली. नियमानुसार अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर ५४५ दिवसात परिसीमा निश्चित करणे बंधनकारक असताना सरकारने अद्याप ती निश्चित केली नाही. त्यामुळे इको सेन्सेटीव्ह झोन असतानाही या अभयारण्यात वृक्षतोड तसेच बेकायदा बांधकामे उभी राहत आहेत. याशिवाय याठिकाणी उत्खननही सुरू असल्याने स्टॅलिन दयानंद यांच्या वनशक्ती संस्थेमार्फत ॲड झमान अली यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्यायमूर्ती एन एम जामदार यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. मागिल सुनावणीच्यावेळी न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरत पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांना कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज पर्यावरण विभागाचे अधिकारी जातीने खंडपीठासमोर हजर होते. त्यावेळी सरकारने येत्या ४० दिवसात ही परिसीमा ठरविण्यात येईल व त्याबाबत नोटिफिकेशन काढले जाईल, अशी हमी न्यायालयात दिली. याची दखल घेऊन न्यायालयाने याचिकेची सुनावणी तहकूब ठेवली.

## स्थायी समितीचे अधिकार कमी करण्याचा प्रस्ताव फेटाळला

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी)- स्थायी समितीत येणारे ५० ते ७५ लाखांपुढील विकासकामांच्या खर्चाचे प्रस्ताव यापुढे ४ कोटींच्या पुढचेच आणून समितीचा अधिकार कमी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. मात्र स्थायी समितीने प्रखर विरोध दर्शविल्यानंतर प्रस्तावाबाबतचे सर्व विभागाना काढलेले परिपत्रक प्रशासनाने त्वरीत मागे घेतले.

मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत ५० ते ७५ लाखांपुढील विकास कामांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे असलेले अधिकार कमी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. त्यानुसार ४ कोटींच्या पुढचेच विकास कामांचे प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवले जाणार होते.

बजाज इलेक्ट्रिकल्स लि.
कन्झ्युमर प्रॉडक्ट्स टर्नओव्हरमध्ये वृद्धी ३१.७% आणि ईबीआयटीमध्ये वृद्धी २१.४%
BAJAJ
Bajaj Electricals Ltd.
Inspiring Trust



३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रीकृत वित्तीय निष्कर्ष

(प्रति समभाग डेटा व्यतिरिक्त ₹ लाखांमध्ये)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०६.१९ (अलेखापरीक्षित) | ३०.०६.१८ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.१९ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.१९ (लेखापरीक्षित) |
| १ | कामकाजांपासून एकूण उत्पन्न | १३०,०६९ | ११३,९९३ | १७७,५१८ | ६६७,९४१ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | २,३३८ | ६,२२९ | २,७७७ | २४,३५१ |
| ३ | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | २,३३८ | ६,२२९ | २,७७७ | २४,३५१ |
| ४ | कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | १,३७० | ४,०१४ | १,५०१ | १५,३५८ |
| ५ | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी (करपश्चात) नफा/(तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांनी युक्त) | १,४५० | ४,०५८ | ९८१ | १४,९२५ |
| ६ | समभाग भांडवल | २,०४९ | २,०४३ | २,०४८ | २,०४८ |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शवण्यात आल्याप्रमाणे | | | | १०३,५३७ |
| ८ | प्रति समभागावरील उत्पन्न (₹२/-चे प्रत्येकी) | | | | |
| | मूलभूत : | १.३४ | ३.९३ | १.४७ | १५.०२ |
| | सौम्यीकृत : | १.३३ | ३.९१ | १.४६ | १४.९८ |
| ९ | डिबेंचर विमोचन राखीव | ४,६२५ | - | ४,६२५ | ४,६२५ |

अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्षांचे महत्त्वपूर्ण आकडे

(₹ लाखांमध्ये)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०६.१९ (अलेखापरीक्षित) | ३०.०६.१८ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.१९ (लेखापरीक्षित) | ३१.०३.१९ (लेखापरीक्षित) |
| १ | कामकाजांपासून एकूण उत्पन्न | १२९,७७८ | ११३,९९३ | १७७,२९४ | ६६७,३१४ |
| २ | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | २,७३१ | ६,२२९ | ४,३८६ | २५,९४४ |
| ३ | कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | १,७४० | ४,०५३ | २,८५४ | १६,७०७ |

वरील माहिती ३० जून, २०१९ रोजी समाप्त झालेल्या तिमाहीसाठीच्या कालावधीसाठी तपशीलवार अलेखापरीक्षित/लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवरून, जे लेखासमितीने पुनर्विलोकित केलेले आहेत, संचालक मंडळाने मान्य केलेले आहेत आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या रेग्युलेशन ३३च्या अनुसार स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल केलेले आहेत, घेतलेली आहे. सदर वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण प्रपत्र स्टॉक एक्सचेंजच्या **www.nseindia.com** आणि **www.bseindia.com** या वेबसाईटवर आणि कंपनीच्या **www.bajajelectricals.com** या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाने
बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेड करिता

स्थळ: मुंबई
दिनांक: ०७ ऑगस्ट, २०१९

शेखर बजाज
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

कॉर्पोरेट आयडेंटीफिकेशन क्रमांक: L31500MH1938PLC009887 | नोंदणीकृत कार्यालय : ४५-४७, वीर नरिमन रोड, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र.: ०२२-६१४९ ७००० | इमेल : legal@bajajelectricals.com | वेबसाईट: www.bajajelectricals.com

# राज्यातील अभूतपूर्व पूरस्थिती, सर्वपक्षीय बैठक बोलवा

## बाळासाहेब थोरात यांची मागणी

मुंबई, बुधवार (विशेष प्रतिनिधी) - राज्याच्या बहुतांश भागामध्ये अभूतपूर्व पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक शहरांमध्ये आणि गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने हजारो लोक बेघर झाले आहेत. आतापर्यंत पुरामुळे १६ नागरिकांचा बळी गेला आहे. लाखो जनावरे वाहून गेली आहेत. पूरपरिस्थिती हाताळण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. सरकारने कुठलाही राजकीय अभिनिवेश न बाळगता पूरस्थिती हाताळण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

यासंदर्भात बोलताना आ. थोरात म्हणाले की, भयंकर दुष्काळातून कसेबसे सावरत असताना राज्यावर पुराचे संकट ओढावले आहे. मुंबई, कोकणासह, उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रातल्या बहुतांश भागात जोरदार पाऊस झाल्याने पूरस्थिती निर्माण झाली आहे. गोदावरीला पूर आल्याने नाशिक शहरासह नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने हजारो कुटुंबे उघड्यावर आली आहेत. कोकणात आणि पश्चिम महाराष्ट्रात तर परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. कोल्हापूर शहराला पुराच्या पाण्याने वेढा घातला आहे. हजारो लोक बेघर झाले आहेत. सांगली, सातारा जिल्ह्यातही तीच परिस्थिती आहे. गावे पाण्यात बुडाली आहेत. गृहोपयोगी सामान वाहून गेले आहे. पुरामुळे पीकांची मोठी नासाडी झाली असून पशूधन संकटात सापडले आहे. पुरामुळे जनजीवन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असताना मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळ यात्रा काढून मतांचा जोगवा मागण्यात व्यस्त आहेत.

पूर परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सरकारी यंत्रणेच्या मदतीपासून बहुतांशी नागरिक दूर आहेत. अनेक भागात स्थानिक नागरिक आणि राजकीय पक्षाचे कार्यकर्तेच मदत आणि बचावकार्य करत आहेत. पुरामुळे अनेक भागांत पिण्याचे शुद्ध पाणीही लोकांना मिळत नाही ही परिस्थिती आहे. ज्या भागात पूराचे पाणी ओसरू लागले आहे त्या भागात रोगराई पसरण्याची शक्यता आहे. अशा संकटकाळात सरकारकडून युद्धपातळीवर मदतकार्याची लोकांची अपेक्षा आहे. पण अनेक ठिकाणी प्रशासनाची मदत पोहोचत नाही. त्यामुळे सरकारने या अभूतपूर्व पूरस्थितीवर मात करण्यासाठी व लोकांना तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी कोणताही राजकीय अभिनिवेश न बाळगता सर्वपक्षीय बैठक बोलवावी. यापू-र्वीही राज्यावर जेव्हा संकटे आली तेव्हा त्यावेळच्या सरकारांनी अशा बैठका बोलावून सर्वांशी विचारविनिमय करून मदत कार्य गतिमान केल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे. या संकटकाळातून महाराष्ट्राला बाहेर काढण्यासाठी विरोधी पक्ष पूर्णपणे सरकारला मदत करायला तयार आहे. सरकारनेही आपण सगळं करतोय तेवढंच पुरेसे आहे किंवा योग्य आहे असे समज करून न घेता सर्वांशी चर्चा करावी असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# पवई येथे परीक्षा केंद्रावर ११ उमेदवारांना अटक

## कॉपी करण्याचा प्रयत्न फसला

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी) - पवई येथे परीक्षा केंद्रावर आलेल्या हरियाणाच्या अकरा उमेदवारांना काल पवई पोलिसांनी अटक केली. मायक्रोफोनच्या माध्यमातून स्टाफ सिलेक्शन परीक्षेत कॉपी करण्याचा त्यांचा प्रयत्न तिथे उपस्थित अधिकाऱ्यांनी हाणून पाडला. ताब्यात घेतलेल्या या सर्वांना नंतर पवई पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले होते. अटकेनंतर या सर्वांना अंधेरीतील स्थानिक महानगर दंडाधिकारी न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

अटक उमेदवारांमध्ये प्रदीपकुमार ओमप्रकाश, अमन हरिकेश, मोहित बिजेंदर, नवीन सुभाषचंद्र, राकेश ओमप्रकाश, नवीन रणधीर सिंग, राजू रामनिवास, दिनेश दलबीर, कुशलकुमार पुलकुमार, सुमीत कुलदीप आणि सौरभ सुभाष यांचा समावेश आहे. ते सर्वजण मूळचे हरयाणाच्या जिंद व हिसारचे रहिवाशी आहेत. मंगळवारी दुपारी पवईतील ऑरेम आयटी पार्क, ऑनलाईन एक्झाम सेंटरमध्ये स्टाफ सिलेक्शनची परीक्षा ठेवण्यात आली होती. या परीक्षेच्या सत्रात १ हजार ८७० परीक्षार्थी आले होते. परीक्षा देताना कोणत्याही प्रकारची कॉपी, इलेक्ट्रीक यंत्र घेऊन जाण्यास मनाई करण्यात आली होती. तरीही काही उमेदवार परीक्षा केंद्रावर मायक्रोफोनसह इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू घेऊन आले होते. केतन मोहन चव्हाण हे परीक्षा हॉलमध्ये सुपरव्हिजन करताना त्यांना दुसऱ्या मजल्यावरील परीक्षा केंद्रामध्ये काही उमेदवाराकडे ब्लूटूथ कॉल डिव्हाईस तसेच कानात माईक्रोफोन असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित असलेल्या पोलिसांच्या मदतीने कॉपीच्या तयारीत असलेल्या काही उमेदवारांची तपासणी सुरु केली होती. या तपासणीत त्यांना अकरा उमेदवाराकडे अकरा मायक्रोफोन, ब्लु टुथ कॉल डिव्हाईस, एअरटेल कंपनीचे सिमकार्ड मिळून आले. या घटनेनंतर केतन चव्हाण यांनी ही माहिती पवई पोलिसांना दिली. या माहितीचे गांभीर्य लक्षात येताच पवई पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. या अकरा उमेदवारांना नंतर पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले. याप्रकरणी केतन चव्हाण यांच्या तक्रार अर्जावरुन संबंधित उमेदवाराविरुद्ध ७, ८ महाराष्ट्र विद्यापीठ व बोर्ड परिक्षांमधील गैरवर्तन प्रतिबंधक अधिनियम १९८२ कलमांतर्गत गुन्हा नोंदविला होता. याच गुन्ह्यांत नंतर संबंधित अकरा उमेदवारांना पोलिसांनी अटक केली. पोलीस तपासात ते सर्वजण हरियाणाचे रहिवाशी असून स्टाफ सिलेक्शन परिक्षेसाठी ते मुंबईत आले होते. अटकेनंतर या सर्वांना अंधेरीतील लोकल कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी कोर्टाने त्यांना ९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यांचा तपास पो-लीस निरीक्षक विनोद लाड, पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे हे करीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

epaper.freepressjournal.in